# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


VOL. 4 NO. 1 JAN. 2018 BOOK VI
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

## SPECIAL ISSUE

On the Occasion of One Day National Conference On

# WOMEN EMPOWERMENT IN INDIA

27 January 2018



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | महिलांचा राजकारणातील सहभाग | प्राचार्य व्ही.जी. गुंडरे(रेड्डी)<br>प्रा.सचिन राजाभाऊ डहाळे | 07 |
| 2. | 'महिला सबलीकरण साठी भारत सरकारचे प्रयत्न' | प्रा.आर. एन. निगडे | 09 |
| 3. | स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिलांचा सहभाग | प्रा. एन.ए.पाटील | 11 |
| 4. | स्त्रीवाद : स्त्रीउध्दाराचा विचार व स्त्रीसबलीकरणाची चळवळ | डॉ. सय्यद आर.जे. | 14 |
| 5. | महिला सबलीकरण व भारत | डॉ. आर. बी. शेजूळ | 19 |
| 6. | पक्षीय राजकारणात महिलाचासहभाग | प्रा.डॉ.अधाव एन. बी. | 22 |
| 7. | स्थानिक स्वराज्य संस्थामधील महिला नेतृत्व एक चिकित्सक अभ्यास | डॉ.सुनिल चकवे | 25 |
| 8. | महिला सबलिकरण | प्रा.चावरे एम. व्ही. | 27 |
| 9. | महिला सबलीकरणाची साधने | डॉ. नामानंद गौतम साठे | 29 |
| 10. | स्त्रियांसाठी भारतीय संविधानातील तरतूदी व स्त्रिवादाचे स्वरूप | बिराजदार अंबादास | 31 |
| 11. | महिला सबलीकरण आणि भारतीय संविधान | प्रा.डॉ.बिडवे टी.एस | 34 |
| 12. | महिला सक्षमीकरण आणि राजकारण | डॉ.भुजंग पाटील | 36 |
| 13. | स्त्रीवाद : अर्थ, स्वरुप, विकास व प्रकार | डॉ. जगदीश देशमुख | 39 |
| 14. | महिला सबलीकरण संकल्पना व स्वरूप | डॉ. अनिल दत्तू देशमुख | 43 |
| 15. | Women Empowerment: Meaning, Concept … | Archana K,Chavare | 46 |
| 16. | महिला सबलीकरणासाठी भारतात व महाराष्ट्रात झालेले प्रयत्न | डॉ. विलास नारायण ढाले,<br>डॉ. दिनकर कळंबे | 48 |
| 17. | स्त्रीवाद - अर्थ, स्वरुप, विकास प्रकार | डॉ. दिनेश रा. हंगे | 51 |
| 18. | Empowerment of Women Political Participation in India | Dr. Vivek M. Diwan | 53 |
| 19. | सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत महिलासांठी राबविल्या जाणाऱ्या …. | डॉ.आमले एस.एस. | 57 |
| 20. | स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सक्षमीकरण | प्रा.रासवे दिनकर सुदामराव | 60 |
| 21. | डॉ.शंकर शेष के नाटकों में चित्रित 'स्त्री' चरित्र | प्रा.संजय व्यंकटराव जोशी | 62 |
| 22. | नेतृत्वाच्या माध्यमातुन महिला सबलिकरण | प्रा.सय्यद आर. आर. | 65 |
| 23. | Mass Media and Women | Rajesh K. Gaikwad | 67 |
| 24. | भारतीय महिला आणि आरक्षण | डॉ.राम प्र.ताटे<br>प्रा.अर्चना शिवाजी वाघमारे | 69 |
| 25. | पंचायतराज व्यवस्था आणि महिला सबलीकरण | डॉ. रमाकांत तिडके | 71 |
| 26. | महिला सबलीकरणासाठी भारतात झालेले प्रयत्न | डॉ. आर.के. काळे | 73 |
| 27. | स्त्रीवाद : अर्थ, विकास व प्रकार | क्षीरसागर दिलीपकुमार | 76 |
| 28. | तत्कालीन समाजजीवनाचे दाहक वास्तव :मुक्ता साळवे यांचा निबंध | डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे | 79 |
| 29. | महिला सबलीकरण आणि सामाजिक बदल. | प्रा. आर. ई. भारूडकर | 83 |
| 30. | Woman Empowerment in Rama Mehta's *Inside the Haveli* | Dr. Milind Mane | 86 |
| 31. | Political Participation And Representation Of Women … | Dr. Mohan Chougule | 88 |
| 32. | राजकीय नेतृत्व व महिला सक्षमीकरण | प्रा. मोरे चंद्रकांत | 91 |
| 33. | Women's Empowerment And Political Participation | Shaikh G. A. | 94 |
| 34. | भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग आणि भूमिका | प्रा.महादेव रावसाहेब मुंडे | 98 |
| 35. | स्त्रीवाद : अर्थ, स्वरूप व विकास | डॉ. पंडित महादेव लावंड | 102 |
| 36. | Women Empowerment in India | Dr.P.W.Patil | 106 |
| 37. | Women Empowerment — Challenges | Pradeep Ingole | 108 |
| 38. | महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सक्रीय सहभागाचा … | डॉ.कदम एच.पी. | 110 |
| 39. | स्त्री–सपक्तीकरण' की अवधारणा का सम्यक अध्ययन … | डॉ. विनोदकुमार | 112 |
| 40. | महिला सबलीकरणात शासनाची भुमिका - एक दृष्टिक्षेप | प्रा.किरण कि. येरावार | 116 |




Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 41. | महाराष्ट्राच्या राजकारणातील स्त्रीयांची भूमिका | प्रा.डॉ.सुरेश भालेराव<br>प्रा. डॉ. सुनिल शिंदे | 119 |
| 42. | The Political Participation and Indian Women | Rajendra S. Korde | 122 |
| 43. | महाराष्ट्राच्या राजकारणात महिलांचा सहभाग | डॉ.अनंत मदन आवटी | 125 |
| 44. | पंचायतराज व्यवस्थेतील महिला आरक्षण : महिला सबलीकरणाचा एक प्रयास | डॉ.दयानंद माधवराव गुडेवार | 128 |
| 45. | महिला सबलीकरण संकल्पना, उद्दिष्ट्ये आणि समस्या | डॉ. वानखेडे उमाकांत | 131 |
| 46. | भारतीय स्त्रीवादी साहित्याची वाटचाल | डॉ. दीपक सूर्यवंशी | 136 |
| 47. | स्त्रीवाद | प्रा.सौ.कांबळे एस.एस. | 138 |
| 48. | Women Empowerment | Hangargekar Vithal | 141 |
| 49. | महिला सक्षमीकरण : भारतातील महिलांचा राजकीय सहभाग | प्रा.डॉ.डी.बी. ढोबळे | 143 |
| 50. | महिला सशक्तीकरणात पंचायत राजचे योगदान | डॉ. आर.एन. शेवाळे | 147 |
| 51. | Women's Empowerment In Politics And Representation | Dr.Farooqui Q. M. Y. | 149 |
| 52. | सामाजिक धोरण आणि महिला | डॉ.सिध्देश्वर सटाले | 154 |
| 53. | स्त्रीवाद : अर्थ, उद्दीष्टे आणि विकास | प्रा. डूणगव अशोक | 156 |
| 54. | Participation Of Women In Panchayatiraj ... | Nirmal Ekanath S. | 159 |
| 55. | Contribution of Woman in the Politics of Maharashtra | Dr Arjun Galphade | 165 |
| 56. | पंचायत राजमधील महिला नेतृत्व | प्रा. गौतम कांबळे | 164 |
| 57. | स्त्री वाद आणि स्त्री सबलीकरण – सद्यःस्थिती | प्रा.गुजर अनुराधा वसंत | 166 |
| 58. | स्त्रीवाद अर्थ स्वरूप, विकास व प्रकार | प्रा.सुधाकर श्रीरंग हांगे | 168 |
| 59. | भारतातील महिला सक्षमीकरण | ज्योत्स्ना जी. गायकवाड | 170 |
| 60. | पर्यावरणवादी स्त्रीवाद | डॉ. काकासाहेब पोकळे | 172 |
| 61. | महिला सबलीकरण : अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे | प्रा.डॉ. बळीराम कटारे | 174 |
| 62. | राजकीय सहभागातुन महिलाचे सबलीकरण | प्रा. सतिष कटके | 177 |
| 63. | महिलासक्षमीकरण आणि प्रशासनाची भूमीका | डॉ.तिडके केशव दत्तराव | 180 |
| 64. | महिला सबलीकरण भारतीय लोकशाही सक्षमीकरणाची पूर्वअट | प्रा.एकनाथ खरात | 182 |
| 65. | भारतातील महिला सबलीकरण | प्रा. विलासराव लवटे | 185 |
| 66. | स्त्रिवादाचा अर्थ, दृष्टीकोन व अभ्यासपध्दती | लोखंडे श्रीरंग शामराव | 188 |
| 67. | स्त्रीवाद : ऐतिहासिक पार्श्वभूमी, उद्देश व स्वरुप | प्रा.डॉ.एस.के.शिंदे,<br>प्रा.एम.बी. जोगदंड | 190 |
| 68. | Constitution Of India And Women Empowerment | Dr. V. M. Mahure | 193 |
| 69. | मानवी हक्क आणि महिला | डॉ. मानवते उत्तम | 197 |
| 70. | पंचायतराज व्यवस्था महिलासबलीकरण : काल, आज आणि उद्या | प्रा. डॉ. अमोल काळे | 200 |
| 71. | महिला सबलीकरणामध्ये प्रशासनाची भुमिका | प्रा बबन आमले | 202 |
| 72. | महिला सबलीकरणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेले प्रयत्न. | प्रा.बदनाळे शिवरूद्र | 205 |
| 73. | स्त्रीवादी साहित्य संकल्पना व स्वरुप | डॉ.गव्हाणे भाऊसाहेब | 209 |
| 74. | महिलासक्षमीकरणात पंचायतराज व्यवस्थेची भूमिका | चव्हाण दिपक | 211 |
| 75. | महिला सबलीकरण संकल्पना व समस्या | डॉ. कल्पना कदम | 213 |
| 76. | महिला सबलीकरण काळाची गरज | डॉ.सुनिलपिंपळे | 215 |
| 77. | महिला सबळीकरणामध्ये प्रशासनाची भूमिका | डॉ. ए. एन. सिध्देवाड | 217 |
| 78. | महिला सबलीकरण :अर्थ स्वरूप उद्दिष्टये | डॉ. सूर्यकांत सांभाळकर | 220 |

Scanned with OKEN Scanner

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# 46.

# भारतीय स्त्रीवादी साहित्याची वाटचाल

प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी
मराठी विभाग
शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय,
कळंब, ता. कळंब, जि. उस्मानाबाद 413507

**प्रास्ताविक :**साहित्य व समाज यांचा अनन्यासाधारण संबंध असून तो मानवी जीवनाबरोबरच अविरतपणे चालणारा प्रवाह आहे. साहित्य एका अर्थाने समाजाचा आरसा म्हटले जाते. अतिप्राचीन काळापासून व्यक्त होण्यासाठी मानवाने आपली प्रतिभा साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र व प्रवासवर्णनातून दुःख, वेदना व जीवनाविषयीचे भाष्य केले आहे. कोलाधात ग्रामीण दलित, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी अशा विविध प्रवाहाद्वारे साहित्य अभिव्यक्त झाले आहे. अनेकविध साहित्य प्रवाहातून एक स्वतंत्र साहित्यप्रवाह स्त्रीवादी साहित्य अतिशय गतिमान झालेले दिसून येते.भारतीय समाजव्यवस्था पुरूषसत्ताक वर्चस्व व स्त्रियांना दुय्यम दर्जा व स्थान देणारी आहे. स्त्रियांचे हक्क, अधिकार, कर्तव्य, समान संधी, आचार-विचार लेखन, शिक्षण-नोकरी व आरक्षण, सामाजिक न्यायासाठी स्त्रीवादी चळवळ गतिमान झाली आहे. स्त्रीवादी चळवळीचे केंद्र भारतीय 'समाजमनातील मानसिकता' असल्याचे स्पष्ट होते. आत्मसन्मान व व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यासाठी, अस्मितेच्या प्रश्नांची जाणीव सर्वव्यापक अशी भूमिका साकारण्यासाठी स्वतंत्र विचारांचे व्यासपीठ म्हणून स्त्रीवादी साहित्याची निर्मिती झाली आहे. स्त्री समाजाला उद्देशून बंडखोर भाषेतून प्रश्न विचारते –

*का फक्त आम्हीच कुलशील जपायचं?*
*का फक्त आम्हांलाच बंधन लक्ष्मण रेषेचं?*
*- आशा भिडे*

एकीकडे जगात श्रेष्ठ अशी भारतीय संस्कृती मानली जाते. परंतू दुसरीकडे स्त्री-पुरूषांच्या बाबतीत असणारी विषमता, माणूस म्हणून स्त्रियांचे अस्तित्व साहित्यातून शोधण्याचा प्रयत्न स्त्रीवादी साहित्यातून केला आहे.

समाजातील अनेक समस्यांची उकल करण्यासाठी स्वतंत्र साहित्यप्रवाह म्हणून स्त्रीवादी साहित्य विकसित झाले आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व भौतिक क्षेत्रात आज प्रचंड बदल झालेला दिसून येतो. इंटरनेट, मोबाईल, 3-जी, 4-जी व नॅनो टेक्नॉलॉजी च्या युगात सर्वत्र वैश्विक क्रांती होताना दिसत आहे. स्त्री जाणीवा, प्रश्नांचा मागोवा याद्वारे घेतला जात आहे. बालविवाह, विधवा विवाह, प्रेमविवाह, प्रौढ विवाह, कुमारिकांचे प्रश्न, विवाहबाह्य संबंध, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न, व्यसनाधीन पुरूषांच्या वासनांध भक्ष्य झालेल्या स्त्रिया अशा अनेकपदरी समस्या चित्रण आज निर्भिडपणे मराठी साहित्यातून आलेले आहे.

आजच्या वर्तमानकालीन स्त्रियांचे साहित्यातील चित्रणात येणारी स्त्री विकसित स्वतंत्र, सजग व पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून कष्ट करणारी आहे. समाजात अद्वितीय स्थान निर्माण करणारी आहे. रांधा-वाढा, उष्टी काढा अशी मर्यादित विश्वात वावरणारी स्त्री हा स्त्रीवादी साहित्याला मान्य नाही. प्रेमाचे, प्रणयाचे, परीकथेप्रमाणे नाजूक भावविश्व प्रस्तुत साहित्यात अपेक्षित नाही. पूर्वापार साहित्यात स्त्रीयांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे.

**स्त्रीवाद : संकल्पना-स्वरूप :**

- मानव म्हणजे पुरूष, स्त्री हे त्याचे उपांग ह्या विचाराला छेद देणारे, त्याबद्दल प्रश्न निर्माण करणारे, त्यातील जटिलता धूसरता मांडणारे स्त्रीवादी साहित्य.
- लिंगभेदाधिष्ठीत विषमता जीवनशास्त्रीय म्हणजे निसर्ग नियमानुसार नसते, तर मानवी संस्कृतीत घडवली जाते असे स्त्रीवादी मानतात.
- स्त्री-पुरूषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार व पुनर्रचना म्हणजे स्त्रीवाद. - *सुमती लांडे*
- स्त्रियांच्या एकूणच जीवनाविषयी समाजापुढे निर्माण झालेले प्रश्न-उपप्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारी मतप्रणाली म्हणजे स्त्रीवाद. - *प्रीती सदावर्ते*
- स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या हक्कासाठी आत्मसन्मानासाठी लढा देणे आवश्यक आहे. हा लढा म्हणजे स्त्रीवाद. - *रजिया पटेल*
- स्त्रीवाद 1960 नंतर जन्माला आलेल्या संकल्पना असून पुरूषांसारखे अर्थपूर्ण स्थान प्राप्त करून देणारी संघर्षशील विचारप्रणाली आहे एकूणच स्त्रियांचे अधिकार यांचे समर्थन करणारे विचारसूत्र आहे अशा या स्त्रीवादाचा उगम पाश्चात्य जगात झालेला दिसतो. - *मंगला वरखेडे*

**पार्श्वभूमी :**

स्त्रीवादी जाणीवा अभिव्यक्त करणारा ताराबाई शिंदे यांचा 1982 मध्ये लिहीलेला स्त्री पुरूष तुलना हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो. 1851 मध्ये पहिल्यांदा जॉन स्टुअर्ट मिलने पार्लमेंटमध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क मागितला. 8 मार्च 1857 मध्ये अमेरिकेतील



Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

न्युयॉर्क शहराच्या एका चौकात आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी भव्य मोर्चा काढण्यात आला. याच दरम्यान आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न झाला. याचाच एक भाग म्हणून जगभर स्त्री पुरूष समानतेचा विचार रूजवला गेला व आज 8 मार्च हा महिला दिन म्हणून साजरा होतो. स्त्रीवादी संकल्पनेची सैद्धांतिक मांडणी पाश्चात्य अभ्यासात सिमॉन दी-बोव्हा यांनी आपल्या 1949 मध्ये लिहीलेल्या 'द सेकंड सेक्स' या ग्रंथात समानतेच्या तत्वावर भर दिला. स्त्री ही जन्माला येत नाही, तर ती स्त्री म्हणून घडवली जाते. तसेच इ.स. 1974 मध्ये टोरंटो येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषद भरवली. यात स्त्रीमुक्तीची जागतिक स्तरावर मांडणी करण्यात आली. तेंव्हापासून युनेस्कोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. प्रारंभीच्या काळात राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, वि. रा. शिंदे आदिंनी समाजातील असलेल्या चालीरिती, प्रथा, परंपरा व नेमकेपणाने त्याचा वेध घेतला आहे. सती प्रथा, बालविवाह, जरठविवाह, केशवपण अशा अनेक बाबींचे स्त्रीवादी साहित्यातून लेखन करण्यात आले आहे. याच साहित्याला स्त्रीवादी साहित्याचे प्रेरणास्थान मानले जाते. स्त्रीवादी साहित्य व आजच्या परिस्थितीमध्ये स्त्री पुरूष समानता यासाठी शासकीय स्तरावर काही उपाययोजना होताना दिसतात.

**महिलांना राजकीय क्षेत्रात सहभाग :**

समाजातील स्त्रीयांची शक्ती व वाटा हा 50 टक्के असल्याने त्यांची उन्नती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही हे विचारात घेऊन 73 व्या घटनादुरूस्तीने पंचायत राज व्यवस्थेमध्ये 33 टक्के आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद इत्यादी ठिकाणी आज महिलांचे प्रतिनिधीत्व सिद्ध होत आहे. समाज व देशाच्या निर्णय प्रक्रियेत महिलांना अधिकार मिळाल्याने नवचैतन्य विकसीत होऊ लागले आहे. तरी परंतु मुळात राजकारणात असलेले, गुन्हेगारी, हिंसाचार, भ्रष्ट व्यक्तींची पुर्ती अशा बाबींमुळे समाजात स्त्रियांना पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रभावीपणे काम करता येत नाही हे वास्तव आहे.

**महिला विकास व सद्यस्थिती :**

भारतीय समाजव्यवस्थेत असलेल्या महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थैर्यासाठी विविध प्रयत्न होत आहेत. शासकीय पातळीवर अनेक कायदे, सोयी सवलती दिल्या, नोकरी करणाऱ्या स्त्रियांना समान वेतन, आरोग्य सवलती देण्यात आल्या आहेत. परंतु आजही ग्रामीण भागात 80 टक्के महिला शेतीतील पुरूषांबरोबर श्रमदान करतात. अशा स्थितीत त्यांचा मालकीहक्क मात्र कधीच नसतो. केवळ विशिष्ट योजनांचा लाभ पुरूषांना मिळत असेल तर तेथे तेवढे स्त्रियांना संधी दिल्याचे कागदपत्रावरच दिसते.

**महिला सबलीकरण व मराठी साहित्य :**

महिलांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ समाजाच्या सर्वच प्रक्रियेत होताना दिसते. शासकीय, निमशासकीय स्तरावर शिक्षण, आचारविचार व लेखन स्वातंत्र्याची संधी स्त्रीयांना मिळत आहे. स्त्रियांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी साहित्यातून अनेक साहित्यीक लेखन करत आहेत. आजच्या काळात देशाच्या सर्वांगिण विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा खर्च समान पातळीवर होणे अपेक्षित आहे. परंतु युनिसेफच्या अहवालाप्रमाणे जर मुलींच्या शिक्षणावर खर्च केला नाही तर भविष्यातील सर्व विकासकामावर त्याचा विपरित परिणाम होईल. याच संदर्भात केरळमधील मुलींचे शिक्षणाचे प्रमाण 90.86 टक्के एवढे आहे. येथे 100 टक्के साक्षरता मानली जाते परंतु हे वास्तव विचारात घेतले जात नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात हजार पुरूषांच्या मागे 1056 मुली आहेत. स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण आजही चिंताजनक असून अलीकडील सर्वेक्षणानुसार 50 टक्के महिलांचे प्रमाण केवळ 12 वी पर्यंतचे व तद्नंतरची उच्च शिक्षणातील गळती प्रचंड आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये मुलीचे लग्न व मुलाचे शिक्षण या पद्धतीने विचार केला जातो. पारंपारिक मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

**सारांश :**

महिलांचा आर्थिक विकास व स्थैर्य होण्यासाठी शासनाने आज विविध पदावर जसे वकील, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक, पायलट, कलेक्टर, शास्त्रज्ञ अशा सर्वच क्षेत्रात महिला अग्रेसर आहेत. असे प्रयत्न केले जात आहेत. वडीलांच्या संपत्तीत मुलांबरोबर समान वारसा, पोटगीचा कायदा, बचत गटा मार्फत स्वयंसिद्धा अभियान, व्यवहारीकदृष्ट्या महिलांना बँकिंग क्षेत्रात नव्याने संधी मिळत आहेत. सर्वच क्षेत्रातील करीअरच्या माध्यमातून त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे. नवचेतना मिळाल्याने महिला सक्षमपणे स्वावलंबी आयुष्य जगत आहेत. या सर्वच गोष्टींचे प्रतिबिंब साहित्यातून अभिव्यक्त होत आहे.

साहित्य समाजाला दिशा देण्याचे चिरंतन काम करते. भारतीय समाजव्यवस्थेत अनेक समस्या असून साहित्यातून या समस्यांना व्यक्त केले जाते. स्त्रीवादी साहित्यात गौरी देशपांडे, मेघना पेठे, छाया दातार, कवयित्री निरजा, कविता महाजन, कमल देसाई, अंबिका सरकार, आशा बगे अशा चळवळीच्या लेखिकांनी वैचारिक साहित्यात या स्त्रीवादी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

**संदर्भग्रंथ :**

1) प्रा. बी. वाय. कुलकर्णी : महिला सबलीकरण शासकीय प्रयत्न.
2) डॉ. स्वाती कर्वे (संपा.) : स्त्री विकासाचे नवे क्षितीज
3) समाज प्रबोधन पत्रिका जानेवारी ते मार्च 2005.
4) मराठी अभ्यास मंडळ, जून 2013, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा कथात्म साहित्य पब्लिकेशनल पब्लिशर्स औरंगाबाद.

□□□



Scanned with OKEN Scanner